# पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६
## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे- पनवेल येथील मंजूर विकास योजना नुसार न.भू.क्र. १२७९, १२७९/२/अ/१ मधील ९.१५ मी. रूंद रस्त्याखालील बाधित क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन :- मौजे- पनवेल, ता. पनवेल येथील श्री मंगल कलश को. ऑ. हौ. सोसायटी यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील प्रस्तावित ९.१५ मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र पुढीलप्रमाणे :-

१) मौजे- पनवेल, न.भू.क्र. १२७९, १२७९/२/अ/१ रस्त्यासाठी बाधीत— ४६.०० चौ. मी.

त्यास मोजणी नकाशानुसार चतु:सीमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस : लागून न.भू.क्र. १२८५
पश्चिमेस : लागून रस्ता
दक्षिणेस : लागून न.भू.क्र. १२७७, १२७८/१
उत्तरेस : लागून रस्ता

टिप :- उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

सहाय्यक संचालक, नगररचना
पनवेल महानगरपालिका

जा क्र. - पमपा/नरवि/टिडीआर/२६-२५/ १२८२ /२०२५ दिनांक : ०८ /१२ /२०२५

टिप - सदरची जाहीर नोटीस पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.